ठाणेनगर व राबोडी वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ६८ /२०२६ दि. २४/०३/२०२६

–: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

ज्याअर्थी, ठाणेनगर व राबोडी वाहतूक उपविभागाच्या हद्दीत दि.२६/०३/२०२६ रोजी **'श्रीराम नवमी'** निमित्ताने खोपट व डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोडवर कॅडबरीनाका या ठिकाणाहून सायंकाळी १६:०० वा. सुरु होणार आहे. सदरचा रस्ता अरूंद असुन परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे. :–

प्रवेश बंद – १) खोपट सिग्नल कडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोडने सिव्हील हॉस्पिटल कॉर्नरच्या दिशेने जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **खोपट सिग्नल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – **अ)** सदरची वाहने खोपट सिग्नल डावे वळण कोलबाड नाका, मिनाताई ठाकरे चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

ब) सदर वाहने खोपट सिग्नल उजवे वळण चरई कट, अल्मेडा चौक इच्छित स्थळी जातील.

प्रवेश बंद – २) गोकुळनगर मिना ताई ठाकरे चौक उथळसर कडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **मिना ताई ठाकरे चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – सदर वाहने मिनाताई ठाकरे चौक डावे वळण घेवुन जीपीओ चौक मार्गे इच्छीत स्थळी जातील.

प्रवेश बंद – ३) स्टेशन कडुन टॉवर नाका मार्गे सिव्हिल हॉस्पीटल कडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांस **मुस चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – सदर वाहने मुस चौक येथून डावे वळण घेवुन गडकरी रंगायतन मार्गे इच्छीत स्थळी जातील.

प्रवेश बंद – ४) जीपीओ कडुन आनंद आश्रम मार्ग टावरनाका कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – सदरची वाहने भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर स्मारक येथून डावे वळण घेवुन टॉवर नाक्यावरून डावे वळण घेवून इच्छीत स्थळी जातील.

सदर वाहतूक अधिसूचना **दि. २६/०३/२०२६ रोजी सायंकाळी १६.०० वा. पासुन ते मिरवणुक कार्यक्रम संपे पर्यंत** अंमलात राहील.

सदर अधिसूचना फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, पोलीस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू होणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सविनय सादर

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे.
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.

प्रत माहितीसाठी

प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१, ठाणे.

पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
विभाग नियंत्रण, राज्य परिवहन, ठाणे.
नियंत्रण कक्ष, ठाणे शहर
विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे.
प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.
प्रत माहिती व कार्यवाहीसाठी,
सहायक पोलीस आयुक्त, ठाणे वाहतूक विभाग, पो.नि. ठाणेनगर व राबोडी वाहतूक उपविभाग.